# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

**आजपर्यंत विद्यापीठांनी संयुक्त कृषि संशोधन व विकास समितीव्दारे संशोधन शिफारशी केलेले पिकनिहाय तंत्रज्ञान**

## नैसर्गिक साधन संपत्ती व्यवस्थापन : एकात्मिक शेती पध्दती व पीक पध्दती :

१. उत्तर कोकण किनारपट्टी विभागासाठी पिक + दुग्ध उद्योग या कृषि पध्दतीची शिफारस करण्यात येते. यामध्ये भात-गवार या पिक पध्दती बरोबर पशु घटकामध्ये १ म्हैस/२ गाय, २ कोंबड्या यांचा समावेश असावा. याव्यतिरीक्त चारा पिक, अन्नद्रव्य मिश्रण, गांडूळ खत इ. निविष्ठा पुरविणेबरोबर धान्य व दुग्ध यांचे मूल्यवर्धन होणे आवश्यक आहे. तसेच एकूण उत्पादकता वाढविण्यासाठी पिक व्यवस्थापन व पशुसंवर्धन या विषयावर शेतकरी प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. (२०१७)

२. उत्तर कोकण किनारपट्टी विभागासाठी अधिक उत्पादन व नफा मिळविण्यासाठी पुढीलप्रमाणे एकात्मिक शेती पध्दती मॉडेल शिफारस करण्यात येते. (२०१७)

**एकात्मिक कृषि पध्दती मॉडेल : क्षेत्र १ हेक्टर**

| (अ) पीक पध्दती | | | |
|---|---|---|---|
| **खरीप हंगाम** | | **रब्बी हंगाम** | |
| **पीक** | **क्षेत्र (हे.)** | **पीक** | **क्षेत्र (हे.)** |
| भात | ०.२० | वांगी | ०.१० |
| | | कलिंगड | ०.१० |
| नागली | ०.०५ | चवळी | ०.०५ |
| भुईमूग | ०.१० | वाल | ०.१० |
| काकडी | ०.१० | मधुमका | ०.१० |
| चारापिक संकरीत नेपिअर बाजरा (बहुवर्षायु) | ०.०५ | चारापिक संकरित नेपिअर बाजरा (बहुवर्षायु) | ०.०५ |
| **एकूण (अ)** | **०.५०** | **एकूण** | **०.५०** |

| (ब) उद्यानवर्गीय पिके | | |
|---|---|---|
| **पीक** | **पिकाची जात** | **क्षेत्र (हे.)** |
| आंबा | रत्ना, केसर आणि हापूस | ०.२० |
| आवळा | कृष्णा, कांचन आणि चकैया | ०.०५ |
| चिकू | कालीपत्ती | ०.०५ |
| नारळ + आंतरपिके काळीमिरी दालचिनी जायफळ | प्रताप, पन्नियुर-१ कोकण तेज, कोकण सुगंध | ०.०५ |
| रोपवाटिका आंबा कलमे चिकू कलमे | रत्ना, केसर आणि हापूस, कालीपत्ती | ०.०५ |
| | **एकूण (ब)** | **०.४०** |

| (क) पशुधन | | |
|---|---|---|
| दुग्धशाळा ३ गाई | २ संकरीत गाई : जर्सी १ स्थानिक गाय | ३५.७५ चौ. मी. |
| शेळी युनिट : १० मादी अ २ नर | कोकण कन्याळ | ३५.७५ चौ. मी. |
| कुक्कुटपालन : ३ ते ४ बॅचेस/वर्ष १५० ते २०० पक्षी/बॅच | गिरीराज आणि कडकनाथ | ३५.७५ चौ. मी. |
| | **एकूण (क)** | **१०७.२५ चौ. मी.** |

| (ड) पुरक घटक | | |
|---|---|---|
| गांडूळ खत युनिट | आयसेनिया फेटिडा | १८.०० चौ. मी. |
| | **एकूण (ड)** | १८.०० **चौ. मी.** |

| (इ) इतर वापराकरीता क्षेत्र | |
|---|---|
| भांडार, मळणी करीता खळे, रस्ता, बांध इत्यादी | ८७४.७५ चौ. मी. |
| **एकूण (इ)** | ८७४.७५ **चौ. मी.** |
| **एकूण अ + ब + क + ड + इ** | **१.०० हे.** |

३. कोकण किनारपट्टीतील खार जमिनीत पुढीलप्रमाणे एकात्मिक शेती पध्दतीची शिफारस करण्यात येते. (२०१७)

| **खार जमिनीमधील एकात्मिक शेती पध्दतीचे घटक (१ हेक्टर)** | | | |
|---|---|---|---|
| **१) हंगामी पिके** | | | |
| **खरीप पिके** | **क्षेत्र (हेक्टर)** | **रब्बी पिके** | **क्षेत्र (हेक्टर)** |
| भात | ०.५० | वाल | ०.२५ |
| भाजीपाला (बांधावरील भेंडी) | ०.०२ | | |
| **एकूण** | **०.५२** | **एकूण** | **०.२५** |

| **२) फलोद्यान पिके (बांधावर)** | |
|---|---|
| नारळ | ०.१५ |
| मसाला पिके | ०.०१ |
| चिकू | ०.०३ |
| **एकूण** | **०.१९** |
| | |
| **३) पशुसंवर्धन** | |
| मत्स्य तलाव | ०.२०३५ |
| कुक्कुटपालन (५० कोंबड्या) | ०.००३५ |
| **एकूण** | **०.२०७०** |
| | |
| **४) पुरक घटक** | |
| गांडूळ खत | ०.००४० |
| परसबाग | ०.००२८ |
| **एकूण** | **०.००६८** |
| | |
| **५) जमिनीचा इतर वापर** | |
| भांडारगृह, झोडणी खळे, बांध, रस्ते | ०.०७६२ |
| **एकूण** | ०.०७६२ |
| **एकूण (१ ते ५)** | १.० |